माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.४३६/२३/अ.क्र.६५८७/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.४३७/२३/अ.क्र.६५८८/२५/०१**

**श्री. निओशेरवान बलोच**
२२/ए, दौलत हाऊस जवळ,
गांवदेवी मंदिर, वी. पी. रोड,
अंधेरी (प.), मुंबई-४०००५८

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वाहतूक अभियंता**
वाहतूक आणि दळणवळण विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
बांद्रे-कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा (पू.) मुंबई-४०००५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा वाहतूक अभियंता**
वाहतूक आणि दळणवळण विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
बांद्रे-कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा (पू.) मुंबई-४०००५१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.१०.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.१६.१०.२०२५रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वाहतूक अभियंता व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा वाहतूक अभियंता अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असे विशद केले की, मूळ माहिती अर्जात मागणी केलेली माहिती प्राप्त झाली असून सदर अपील अर्ज निकाली काढावा, ही विनंती.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. निओशेरवान बलोच यांनी दाखल केलेल्या प्रस्तुत प्रकरणात यात अपेक्षित असणारी माहिती उपरोक्त द्वितीय अपील अर्ज प्रलंबित असतानाच्या कालावधीत अपिलार्थी यांना प्राप्त झाली असल्याने उपरोक्त द्वितीय अपील अर्ज निकाली काढावे, अशी विनंती अपिलार्थी यांनी व्यक्तिशः केली असून अपिलार्थी यांच्या विनंतीनुसार उपरोक्त द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.१०.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra